दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
मुख्य संपादक : अजश भांगे

बीड/महाराष्ट्र • गुरुवार दि.२७ फेब्रुवारी २०२५ • आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष २ रे • अंक-१२३ • पाने ४ • किंमत ४ रुपये

## माणिकराव कोकाटेंसह सात मंत्र्यांच्या ओएसडीची नेमणूक

**पुणे** –राज्यातील मंत्र्यांचे पीएस आणि ओएसडी नेमणुकीवरून राष्ट्रवादीचे मंत्री माणिकराव कोकाटे यांनी केलेल्या विधानावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सडेतोड उत्तर दिले होते. त्यानंतर याची राजकीय वर्तुळात चर्चा रंगली होती. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर ओएसडी खाजगी सचिव नियुक्तीचे आरोप झाल्यानंतर तातडीने आज अनेक मंत्र्यांचे ओएसडी खाजगी सचिवांची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे.

सध्या राज्यातील पाच मंत्र्यांचे ओएसडी आणि दोन मंत्र्यांच्या खासगी सचिवांची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. तसेच अद्यापही अनेक मंत्र्यांच्या ओएसडी आणि खासगी सचिवांची नियुक्ती बाकी असून मंत्र्यांनी दिलेल्या नावाची छाननी करून मगच नियुक्ती केली जाणार असल्याची माहिती आहे.मंत्री गणेश नाईक, मंत्री मंगलप्रभात लोढा, मंत्री आशिष शेलार, मंत्री माणिकराव कोकाटे आणि बाबासाहेब पाटील यांच्याकडे विशेष कार्य अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर मंत्री जयकुमार रावल आणि इंद्रनील नाईक यांच्या खासगी सचिवांची नियुक्तीचे सामान्य प्रशासन विभागाकडून आदेश जारी करण्यात आले आहेत.

### आदिवासी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध

# सीएसआर निधीच्या उपयोगातून आदिवासी क्षेत्राचा समतोल विकास साधणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन कसोशीने प्रयत्न करीत आहे. त्याकरिता विविध योजनांची अंमलबजावणी सुरू आहे. आदिवासी क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी शासन कटिबद्ध असून सीएसआर निधीच्या उपयोगातून समतोल विकास साधल्या जाईल अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली.आदिवासी विकास विभाग आणि संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (यूएनडीपी) द्वारे सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, आदिवासी समाजाला विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शिक्षण व आरोग्य सेवा जलदगतीने उपलब्ध होणे आवश्यक आहे. सीएसआर निधी केवळ महानगर प्रदेशात न खर्च करता समतोल विकासासाठी उपयोग करावा. तसेच या निधीच्या माध्यमातून शिक्षण व आरोग्य क्षेत्रात निधीचे अधिकाधिक योगदान द्यावे.आदिवासी समाजाला फार मोठा इतिहास व सांस्कृतिक वारसा आहे. या समाजामध्ये नियम, कायदा आणि मूल्ये होती. मात्र कालचक्राच्या ओघात हा समाज मागे पडला. या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनामार्फत अनेक योजना राबविल्या जात आहेत. या योजनांच्या माध्यमातून त्यांच्या जीवनात नवी उमेद निर्माण करण्यात येत आहे. गर्भवती माता आणि बालकांना पोषण आहार मिळावा यासाठी शासन विविध योजना राबवत असल्याचेही मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या जवळपास ९.५% लोकसंख्या आदिवासी समाजाची आहे तर देशाच्या एकूण आदिवासी लोकसंख्येच्या १०% लोकसंख्या ही महाराष्ट्रामध्ये आहे. त्यामुळे मोठ्या



प्रमाणात आदिवासींचा अधिवास असलेले राज्य म्हणून महाराष्ट्राकडे पाहिले जाते. आदिवासी समाजातील मुलांना उच्च दर्जाचे शिक्षण व नैसर्गिक गुणवत्तेला योग्य व्यासपीठ मिळावे, यासाठी नामांकित शाळांमध्ये प्रवेश देण्यात येत असल्याचे त्यांनी यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.अनुसूचित जमातींच्या विकासाला गती देण्यासाठी आदिवासी विभागांने ही परिषद आयोजित केल्याबद्दल मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी विभागाचे अभिनंदन केले. तसेच विभागाने आयोजित केलेल्या या परिषदेमध्ये सहभागी झालेल्या सर्व प्रतिनिधींचे स्वागत करून त्यांचे आभार मानले.यावेळी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आपण काम करत आहोत. आदिवासी विभागाच्या माध्यमातून सामाजिक भागीदारी असलेला सी एस आर फॉर चेंज हा उपक्रम पहिल्यांदाच हाती घेतला आहे. आपण आपल्या सामाजिक दायित्व भागीदारीचा वापर आदिवासी बांधवांच्या उन्नतीसाठी करणार आहोत. आजच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने आपल्या योजनांसाठी कंपन्यांच्या सामाजिक दायित्व भागीदारीमुळे हात बळकट होणार असल्याचे त्यांनी सांगितले.आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे यांनी प्रास्ताविकात आदिवासी विकास विभागाच्या योजनांची माहिती तसेच आदिवासी बांधवांच्या उन्नतीसाठी शासन स्तरावर कसे प्रयत्न सुरू आहेत याबाबत सांगितले. तर शेवटी राजेंद्र भारूड यांनी आभार मानले. यावेळी आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, आदिवासी विकास विभागाचे सचिव विजय वाघमारे, उद्योग विभागाचे सचिव पी.अनबलगन, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भारूड, आयुक्त लीना बनसोड उपस्थित होते.यावेळी झालेल्या चर्चासत्रामध्ये विविध कंपन्यांच्या प्रतिनिधींनी आपले विचार मांडले. चर्चासत्राचे संचालन संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रमाच्या कार्यक्रम प्रमुख श्रीतमा गुप्तभया यांनी केले.

## जिल्हाधिकारी कार्यालयात अपंगांची जीवनावश्यक मागण्यासाठी धाव



**बीड । प्रतिनिधी**

संतप्त झालेल्या दिव्यांग लोकांना अपंगांचे थकित मानधन व रेशनसाठी परेशान आहेत. मागील ४ महिन्यापासून मानधन न मिळाल्याने पोटाचा व दैनंदिन जीवनात अडचणी आल्या आहेत. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले आहे तरी याकडे काळजीपूर्वक लक्ष घालून न्याय द्यावा असे अपंग जनता दलाचे कार्यकर्त्यांची मागणी असून यावेळी अलिम पठाण, नसरीन मोमीन,इतर ही पदाधिकारी उपस्थित होते, तसेच एकल संघटना रुक्मिणी नागापुरे, कौशल्य कळसुले, मंगल कानडे, सह २५ ते ३० अपंग सभासद उपस्थित होते.

## महाशिवरात्रीच्या पावन पर्वावर अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड कंपनीच्या वतीने भाविकांसाठी महाप्रसाद सेवा

### भक्तांच्या सेवेतच खरी ईश्वरसेवा आहे-प्रकाश सिंह कुलदीप खोब्रागडे

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

बोल बम! हर हर महादेव! च्या जयघोषात न्हालेल्या परळी नगरीत महाशिवरात्रीनिमित्त भाविक भक्तांची अलोट गर्दी झाली होती. बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे, श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंगाच्या दर्शनासाठी देशभरातून आलेल्या शिवभक्तांसाठी अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड कंपनीच्या वतीने ५० क्विंटल नायलॉन फराळ महाप्रसाद स्वरूपात वाटप करण्यात आला.




या शुभकार्याचा प्रारंभ अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड कंपनीचे अधिकारी श्री.प्रकाश सिंह व कुलदीप खोब्रागडे यांच्या शुभहस्ते दि. २६ रोजी सकाळी करण्यात आला. श्रद्धेने मंदिरात आलेल्या भाविकांनी महाप्रसादाचा आनंद घेत मोठ्या भक्तिभावाने दर्शन लाभ घेतला. भक्तांच्या सेवेतच खरी ईश्वरसेवा आहे, या भावनेतून अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड कंपनीच्या अधिकाऱ्यांनी .प्रकाश सिंह प्रकाश सिंह. कुलदीप खोब्रागड `.बाबासाहेब चिकाटे . विवेकानंद शिंदे. रोशन कोकुलवार. रघु घनघव.बाळासाहेब मुंडे.अन्वर भाया कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत, उत्साहात व भक्तीभावाने सेवा अर्पण केली. परळी नगरीत शिवभक्तांच्या सेवेसाठी उभारलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. शिवरायाच्या कृपेने आणि अशा सेवाभावी कार्याच्या माध्यमातून समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होत राहो, हीच प्रार्थना!

### नटेश्वर बेदरकर यांच्या अचानक गायब होण्याने खळबळ

## हारकी लिमगाव येथील प्रकरण पोलिसात तक्रार दाखल

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव तालुक्यातील हारकी लिमगाव येथील शेतकरी नटेश्वर मुकुंद बेदरकर हे दिनांक २२ फेब्रुवारी रोजी अचानक गायब झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. दरम्यान, या प्रकरणी पोलीस स्थानकात रितसर तक्रार नोंदविली आहे. या बाबत अधिक माहिती अशी की, माजलगाव तालुक्यातील हारकी लिमगाव येथील रहिवाशी नटेश्वर मुकुंद बेदरकर (वय ३९) हे शनिवार, दिनांक २२ फेब्रुवारी रोजी सकाळी ९ ते ९:४५ वाजेच्या सुमारास बीड येथून गायब झाले आहेत. या प्रकरणाने खळबळ उडाली असून त्यांच्या गायब झाल्याचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. याबाबत शिवाजीनगर पोलीस ठाणे बीड येथे बेदरकर कुटुंबियांनी रितसर तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे



पोलीस निरीक्षक मारोती खेडकर हे कसून तपास करत आहेत. दरम्यान, नटेश्वर बेदरकर यांच्या अचानक गायब होण्याने संपूर्ण बेदरकर कुटुंबीय भितीच्या सावटाखाली वागत आहेत. नटेश्वर बेदरकर गायब प्रकरणी आज मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी रोजी त्यांचे बंधू प्रसाद बेदरकर यांच्यासमवेत नातेवाईकांनी बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांची भेट घेऊन या प्रकरणाचे धागेदोरे लावण्याची मागणी केली. दरम्यान, पोलीस अधीक्षक कॉवत यांनी या प्रकरणाचा कसून तपास सुरू असून लवकरच छडा लावू, अशी माहिती दिली. नटेश्वर बेदरकर यांच्या अचानक गायब होण्याने परिसरात खळबळ उडाली असून पोलीस कसून तपास करत आहेत. मोबाईल सीडीआर आणि विविध ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहेत. मात्र असे असले तरी कुटुंबियांना काही समाज विघातक शक्तींकडून अपहरण झाल्याची भिती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या दिशेने सुद्धा पोलीस आपल्या तपासाची चक्रे वळवू शकतात.

## इयत्ता दहावी व बारावी स्पोर्ट्सचे ग्रेस गुण मिळणार

### स्पोर्ट्स ग्रेस गुणासाठी ३१ मार्चपर्यंत प्रस्ताव पाठवा

**छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे**

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षांना सुरुवात झालेली आहे. दहावी व बारावीची परीक्षा देत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्पोर्ट्सचे ग्रेस गुण देण्यात येणार आहे. त्यासाठी शाळांकडून जिल्हा क्रीडा अधिकारी आणि त्या ठिकाणाहून विभागीय मंडळाकडे १५ एप्रिलपर्यंत प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन विभागीय मंडळाच्या सचिवांनी केलेले आहे. यावर्षी १० व १२वीच्या परीक्षांना सुरुवात झाली असल्यामुळे निकालही लवकरच लावले जाणार आहे. यामुळे विभागीय मंडळाने दिलेल्या मुदतीतच हे मार्क ऑनलाइन पद्धतीने द्यावे लागणार आहेत.

**ऑनलाइन अर्ज कसा करणार ?**

विभागीय मंडळाने उपलब्ध करून दिलेल्या ऑनलाइन लिंकवरून स्प्रोटसचे ग्रेस गुण अपलोड करावे लागणार आहेत. हे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांकडे जातील. त्यात काही तांत्रिक अडचणी असतील, तर विभागीय मंडळाशी संपर्क साधून अर्ज करावा लागणार आहे.

**कोणत्या खेळांसाठी हे गुण लागू?**

१० आणि १२वीची परीक्षा देणाऱ्या खेळाडूंनी खो-खो, कबड्डी, ॲथलेटिक्स, बॉक्सिंग, व्हॉलीबॉल, क्रिकेटसह खेळांमध्ये प्राविण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना आहे.

**संस्थांची जबाबदारी काय?**

शाळांच्या संस्थांनी विभागीय मंडळाने दिलेल्या सूचनेनुसार मान्यताप्राप्त खेळांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थी खेळाडूंची माहिती व कागदपत्रे ऑनलाइन पद्धतीने विहित मुदतीमध्ये भरावी लागणार आहेत.

**अंतिम तारीख काय ?**

शाळांनी ३१ मार्चपर्यंत ऑनलाइन प्रस्ताव सादर करायचे आहेत. जिल्हा क्रीडा विभाग प्रस्तावांची छाननीकरून १५ एप्रिलपर्यंत अंतिम गुण विभागीय शिक्षण मंडळाकडे पाठविणार आहे.शाळांनी ३१ मार्चपर्यंत ऑनलाइन नोंदणी करून जिल्हा क्रीडा विभागाकडे प्रस्ताव पाठवावेत. त्यानंतर जिल्हा क्रीडा विभाग प्राप्त प्रस्तावांची छाननी करून १५ एप्रिल विभागीय शिक्षण मंडळाकडे प्रस्ताव पाठविणार आहे.

**-बाजीराव देसाई, जिल्हा क्रीडा अधिकारी**

# प्रधानमंत्री सहाय्यता निधीत खा.लंके राज्यात अव्वल! खा.लंकेंनी स्वत:सह शरद पवारांचाही कोटा संपविला

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री राष्ट्रीय आरोग्य निधीचा राज्यात सर्वाधिक रूग्णांना लाभ मिळवून देत खासदार नीलेश लंके यांनी नवी दिल्लीमध्येही आपल्या कामाची चुणूक दाखविली आहे. दरवर्षी प्रत्येक खासदाराला असलेला ३५ केसचा कोटा संपल्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या कोटयातून २७ केसेससाठी निधी मिळवत नीलेश लंके हे सर्वाधिक रूग्णांना लाभ मिळवून देणारे खासदार ठरले आहेत. पाच वर्षांपूर्वी विधानसभेत पारनेर-नगर मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व करताना खा. नीलेश लंके यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा राज्यात सर्वाधिक रूग्णांना लाभ मिळवून दिला होता. त्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी अधिकृतपणे नीलेश लंके यांनी या योजनेचा राज्यात सर्वाधिक रूग्णांना लाभ मिळवून दिल्याचे जाहीर केले होते.

खा. नीलेश लंके यांच्याकडे दररोज अनेक रूग्ण किंवा त्यांचे नातेवाईक उपचारासाठी मदत मिळावी यासाठी येतात. खा. लंके हे रूग्णाच्या आजाराची माहीती घेऊन मुख्यमंत्री अथवा पंतप्रधान सहाय्यता निधीतून त्यास मदत मिळेल का याची खात्री करतात. संबंधित आजार दोन्ही योजनांच्या निकषामध्ये बसती नसतील तर लंके हे स्वतः धर्मदाय रूग्णालयांशी



संपर्क करून त्या रूग्णावर उपचार करण्याची व्यवस्था करतात. वेळप्रसंगी सामाजिक संस्थांशी संपर्क करून संबंधित रूग्णास मदत मिळवून देण्यासाठीही लंके यांची धडपड असते. कोणत्याही योजनेमार्फत प्रस्ताव सादर केल्यानंतर त्याचा पाठपुरावा करण्यासाठी खा. लंके यांच्या पारनेर, नगर व मुंबई दिल्ली येथील संपर्क कार्यालयात स्वतंत्र यंत्रणा असून या यंत्रणेमार्फत सादर करण्यात आलेल्या प्रस्तावांचा दररोज आढावा घेतला जातो. प्रस्तावात काही तृटी असतील तर संबंधित रूग्ण किंवा त्यांच्या नातेवाईकांशी संपर्क करून त्रृटी दुर केल्या जातात. आरोग्याच्या मदतीसाठीची यंत्रणा सतर्क असल्याने गेल्या पाच, साडेपाच वर्षात हजारो रूग्णांना आजवर लंके यांच्या माध्यमातून मदत मिळाली आहे. खा. नीलेश लंके हे संसदेत गेल्यानंतर त्यांचा ३५ रूग्णांचा कोटा काही महिन्यात संपला. त्यामुळे त्यांनी पाठविलेले प्रस्ताव प्रधानमंत्री कार्यालयाकडे पडून होते. त्यासाठी प्रत्येक खासदारासाठी दरवषसाठी घालण्यात आलेले ३५ रूग्णांचे बंधन दुर करून अमर्याद रूग्णांना मदत देण्याची मागणी खा. लंके यांनी यापूर्वीच संसदेत केली आहे. खासदार नीलेश लंके यांच्या कोटयातील ३५ तर राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांच्या कोटयातील २८ अशा एकूण ६३ रूग्णांना आजवर १ कोटी ८६ लाख रूपयांची मदत मिळवून देण्यात आली आहे.

## संपादकीय..

# कोकण मोहरतेय!



साधारणत: नोव्हेंबर अखेरपासून कोकणात थंडीची चाहूल लागते. डिसेंबर, जानेवारी महिन्याचा पहिला आठवडा किंवा पंधरवडा हा थंडीचा हंगाम असतो. कोकणातील कडाक्याची पडणारी थंडी ज्यांनी अनुभवलेली असेल ते काश्मीरच्या, नागपूरच्या थंडीलाही न घाबरता सामोरे जातील. थंडीच्या काळात फार छान आल्हाददायक वातावरण असतं. कडाक्याची पडलेली थंडी आणि चुलींवरची 'फुटी' चहा (दूध न वापरता बनवलेला) एकदम भारी. आजकाल अमेरिकन संशोधनानंतर डॉक्टर चहात दूध न टाकता चहा घ्या म्हणून सांगतात. त्यामुळे पूर्वीच्या या 'फुटी' चहाला आज ब्लॅक टीच्या नावाने जगभरात बारसं करून पंचतारांकित हॉटेल संस्कृतीतही त्याला मानाचा पान प्राप्त झालं आहे. अशा चहाचा आस्वाद घेत कोकणातील सामान्य माणूस जगातील सामाजिक, राजकीय घडामोडींवर कमालीच भाष्य केल्याशिवाय त्याला जमणारही नाही.

चालू हंगामात आंबा, काजू, कोकम, जांभूळ, सुपारी या पिकांचं काय होईल कशी स्थिती असेल या संबंधीही कोकणातील शेतकरी गजालींमध्ये रमताना दिसेल आणि भरपूर थंडी पडली तर तोच सामान्य शेतकरी, आंबा, काजू बागायतदार या जोरदार पडणाऱ्या थंडीने आंबा, काजूचा मोहर पाहून कमालीचा आनंदी झालेला दिसतो. यावर्षी पावसाळाही बाराही महिने आहे की काय? असं वाटण्याजोगी स्थिती होती. अधून-मधून केव्हाही पाऊस पडत होता. यामुळे कोकणात फक्त पाऊसच पडणार की काय? कोकणात थंडीच पडणार नाही असा चिंतातुर झालेला शेतकरी, बागायतदार होता; परंतु मागील पंधरवड्यात थंडी आली आणि आंबा, काजूच्या बागांमध्ये मोहोर दिसू लागला. आंबा, काजू बागायतीतील मोहोर पाहून निश्चितच बागायतदार शेतकरी सुखावला. याचे कारण वर्षभराची आर्थिक बेगमी होईल याचा आजच्या घडीला विश्वास बागायतदार शेतकऱ्यांना या आंबा, काजू मोहरामध्ये दिसू लागला आहे. आंबा, काजू, कोकम अशी कोकणात तयार होणारी फळ मागील काही वर्षात अनियमित होत आहेत. बागायतदार शेतकरी आर्थिक तोटा सहन करत आहे. मात्र, कोकणातील शेतकरी आंबा, काजू, कोकमचे नुकसान झाले तरीही शासनाकडून नुकसानभरपाई मिळण्याची वाट न पाहता किंवा आपल्याच बागायतीत बुलडोझर न फिरवता कष्टाची नव्याने मशागत करत प्रयत्न करीत राहातो. यावर्षी नाहीतर पुढच्या वर्षी तरी चांगल फळपीक येईल या अपेक्षेने असतो. कोकणवासीय ज्या श्रद्धेने, भक्तिभावाने आपल्या लाडक्या गणरायाची वाट पाहतो त्याच अपेक्षेने यावर्षी फळपीक चांगलं येईल अशी अपेक्षा ठेऊन कोकणवासीय आहे. कोकणातील हापूस आंब्यावर ज्या पद्धतीने कर्नाटक आदी राज्यातील आंब्याच संकट आलेलं आहे. कोकणातीलही बाजारातून कर्नाटकचा आंबा विक्रीला बाजारात दिसतो. यामुळे कोकणातील आंबा बागायतदार शेतकऱ्यांवर केवढे मोठं संकट उभं आहे ते सहज लक्षात येऊ शकेल. याबाबतही कोकणातील आंबा बागायतदार शेतकऱ्यांनी फारच जागृकतेने विचार करण्याची आवश्यकता आहे. एकिकडे निसर्गाच बदलत्या हवामानाच संकट आहे. त्याचबरोबर फळ बाजारातही डुपलीकेट आंबा, काजू विक्रीला आणून त्यातूनही कोकणातील आंबा, काजूला बदनाम करण्याच काम फार मोठ्या प्रमाणात होत आहे. बागायतदार शेतकऱ्यांनी यासाठी एकसंध असलं पाहिजे. संघटनात्मकतेने याविरोधात उभं राहण्याची गरज आहे; परंतु कोकणातील बागायतदार शेतकरीही पक्षीय राजकारणामध्ये अधिक स्वारस्य घेऊन आहे. आंबा, काजू, कोकम, सुपारी आदी फळपिकांचं उत्पादन घेणारा शेतकरी जर संघटितपणे या सर्वांचा विचार करू लागला तर ते अधिक याग्य होईल.बागायतदार शेतकऱ्यांमध्येही सतत संवाद असणे आवश्यक आहे. फळपिकांवरची चर्चा होत राहायला हवी. त्यात कोकण कृषी विद्यापीठाचे कृषी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतले पाहिजे. शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा, समस्यांवर उपाय कसे करायचे यासाठीचा सकारात्मक संवाद होत राहिला तर विक्री व्यवस्थेच्या बाजारातही कोकणचा दबाव आणि दबदबा तयार होईल. आज आंबा बागायतदार विखुरलेला आहे. तो संघटित होणार नाही याची खात्री एपीएमसी मार्केटमध्ये बसलेल्या आंबा दलालाना आहे. त्यामुळेच कोकणातील बागायतदार शेतकऱ्यांना वाट्टेल त्या पद्धतीने आंब्याला दर दिला जातो. हातरूमालाखाली आजही आंब्याचा दर ठरतो हे दुर्दैवच म्हणावं लागेल. महाराष्ट्रातील ऊस, कापूस, द्राक्ष, डाळिंब, संत्री, मोसंबी अशा असंख्य फळपीक घेणारा शेतकरी संघटित आहे म्हणूनच वर्षानुवर्षे ऊस पिकवणारा शेतकरी शासकीय अनुदानाचे, नुकसानभरपाईचे टॉनिक दिलं जातं. वर्षानुवर्षे शासकीय अनुदानावर पश्चिम महाराष्ट्रातील ऊस पिकवणारा शेतकरी आणि साखर कारखाने उभे आहेत. यातला कुठलाच फारसा वाटा कोकणातील शेतकऱ्याला मिळाला नाही आणि यातही कोकणातील शेतकऱ्याला काय मिळत असेल तर कोकणातील शेतकरी तहसीलकडे अर्ज करून शेजारच्या शेतकऱ्याच नुकसान कसं झालं नाही हे दाखवण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे तिथेही आपण आपल्याच शेतकऱ्याला आडवं जातो. उर्वरित महाराष्ट्रात सर्वांनीच मिळून खाऊ याचा मोठा उद्योग होतो. कोकणातील शेतकरी, बागायतदार सरकारी अनुदानाच्या मेहरबानीवर नसतो हे अनेकवेळा कोकणाने दाखवून दिले आहे. कोकणातील आंबा, काजू बागायतीत झाडांवरचा मोहर पाहून कोकणवासीय सुखावला आहे. आता सर्वकाही निसर्गाच्याच हातात आहे.

# नायलॉन मांजाचे आणखी किती बळी?



आनंदाचे प्रतीक असलेल्या मकरसंक्रातीच्या सणाला नायलॉन मांजामुळे यंदाही गालबोट लागले आहे. संक्रातीच्या सणानिमित्ताने पतंगबाजीचा खेळ खेळला जातो. यासाठी पारंपरिक मांजाचा उपयोग करायला हवा. मात्र, अलीकडे नायलॉन मांजाचाच वापर करत पतंग उडवण्याची भारी हौस अनेकांसाठी जीवघेणी ठरत आहे. इतरांपेक्षा आपलाच पतंग उंच उडावा आणि आपणच पतंगाचे किंग ठरावे या इर्षेतून चक्क प्रतिबंधित नायलॉन मांजा वापरून सर्रास पतंग उडवले जातात. दुसऱ्या बाजूला घातक मांजामुळे निष्पाप जीवांचे नाहक बळी जातात, याकडे दुर्लक्ष होते. अनेक दुचाकीस्वारांच्या गळ्याला इजा झाल्याच्या घटना तर अनेक बालकांचे हात चिरले जाण्याचे सर्रास प्रकार या दिवसांत कानावर येतात. एवढंच नव्हे तर आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांचे जीवही धोक्यात आले आहे.

नाशिक जिल्ह्यामध्ये मनाला चटका लावणारी घटना मंगळवारी घडली. संक्रांतीच्या सणासाठी सोनू धोत्रे नावाचा तरुण गुजरातहून नाशिकला येत होता. पाच महिन्यांनंतर त्याचे लग्न होणार होते. सोनू धोत्रेच्या आई-वडिलांचे निधन झाले आहे. त्यामुळे तो सख्या भावाला भेटण्यासाठी आला होता. देवळाली कॅम्पकडे मोटर सायकलवरून जात असताना सोनूला नायलॉन मांजामुळे फास लागला अन् त्याचा गळा चिरला गेला. त्यात त्याला मृत्यूने कवटाळले. दुसऱ्या घटनेत नंदूरबारमधील कार्तिक गोरवे आजोबांसह मोटारसायकलवरून जात असताना, त्याच्या गळ्यात मांजा अडकला आणि कार्तिकचा गळा चिरला. कार्तिकला जिल्हा रुग्णालयात नेण्यात आले; परंतु उपचारादरम्यान कार्तिकचा मृत्यू झाला. या घटनेने गोरवे कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

अकोला जिल्ह्यातील पालिका कर्मचारी मंगशे बोपटे हे दुचाकीवरून जात असताना गळ्यात मांजा अडकल्याने त्याचाही गळा चिरला गेला. त्याच्या गळ्यावर १५ टाके पडले. सुदैवाने त्याची प्रकृती स्थिर आहे. भंडारा जिल्ह्यात मोटार सायकलवरून जाणाऱ्या शुभम चौधरीचा गळा मांजामुळे चिरला गेला. सुदैवाने त्याचा जीव वाचला. यवतमाळ शहरासह जिल्ह्यात नायलॉन मांजा विक्रीवर जिल्हाधिकाऱ्यांनी बंदी आदेश काढलेला असतानाही पोलिसांच्या नाकावर टिच्चून नायलॉन मांजा विक्री आणि त्याचा वापर झाल्याचे चित्र संक्रांतीच्या दिवशी, यवतमाळ शहरात दिसले. या मांजाचा झटकाही एका ज्येष्ठ नागरिकाला बसला. पोलिसांकडूनही कडक कारवाई होणे अपेक्षित होते. मात्र, वरवरची कारवाई झाल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला. अशा अनेक घटना महाराष्ट्राच्या जिल्ह्या-जिल्ह्यांतून ऐकायला येत आहेत; परंतु प्रशासन म्हणावे तसे ॲक्शन मोडवर आल्याचे दिसत नाही. काही ठिकाणी कारवाईचा बडगा पाहायला मिळाला.

मांजाने बळी घेतल्याच्या घटनेनंतर सतर्क झालेल्या येवला पोलिसांच्या भरारी पथकाने कारवाई करत चौघांना ताब्यात घेतले. या चौघांकडून नायलॉन मांजा जप्त करण्यात आला. भिवंडीत महानगरपालिकेने केलेल्या धडक कारवाईत नायलॉन मांजा जप्त केला, अशा हाताच्या बोटावर मोजता येतील अशा कारवायांनी मांजा बंदी झाली असे म्हणायचे का? तसे पाहायला गेले तर पोलिसांना उशिरा सुचलेले शहाणपण म्हणावे लागेल. राज्यात प्लास्टिक बंदीचा कसा बट्याबोळ झाला हे जनतेने पाहिले आहे. कारवाई कोणावर होते तर ज्यांच्या हातात प्लास्टिकची पिशवी सापडते त्यांच्यावर? परंतु प्लास्टिकच्या पिशव्या उत्पादन करणाऱ्या कारखान्यांवर मोठी कारवाई झाल्याचे ऐकीवात नाही. त्यामुळे मुळावर घाव घालावा तसा प्लॉस्टिक बंदीसाठी ज्या ठिकाणी उत्पादन होते, त्याच ठिकाणी कडक कारवाई केली तर माल बाजारात आला नसता. तसाच काहीसा प्रकार नॉयलॉनच्या मांजांबाबत म्हणता येईल. हा मांजा ज्या ठिकाणी तयार होतो, तेथेच कारवाई केली तर बाजारात त्याचा साठा उपलब्ध होण्यावर अडचणी येतील; परंतु आपल्याकडे अनेक कायदे तयार होतात. मात्र, त्याची अंमलबजावणी करण्यावर उदासीनता दिसून येते.

नायलॉन मांजाच्या विक्री आणि वापरावर बंदी असतानाही प्रशासनाच्या सुस्त कारवाईमुळे दोघांना जीव गमवावा लागला, तर अनेकजण गळा चिरल्याने गंभीर जखमी झाले. या सणाला लागलेल्या गालबोटामुळे नायलॉन मांजा न वापरण्याचे आवाहन अनेक संस्थांनी केले आहे, तर नायलॉन मांजाच्या विक्रीविरोधात भरारी पथके नेमली असतानाही ही विक्री कशी सुरू आहे, हा प्रश्न कोड्यात टाकणारा आहे. त्याचे कारण जीवघेण्या नायलॉन मांजावर कायद्याने बंदी असली तरी ती फक्त कागदोपत्रीच मर्यादेत असल्याचे चित्र सध्या तरी सर्वत्र पाहायला मिळत आहे. राज्यात आज संक्रात सणाच्या निमित्ताने पतंगबाजीचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. प्रत्येक मकरसंक्रातीला नायलॉन मांजावरील बंदीची चर्चा होते. पण, नायलॉन मांजा विकणाऱ्यांवर पोलीस प्रशासनाकडून जुजबी कारवाया केल्या जातात असे दिसते, त्यामुळे प्रशासनाकडून चिरीमिरी घेऊन नायलॉन मांजा विक्रीला छुपा पाठिंबा आहे का? असे अनेक प्रश्न नागरिकांच्या मनात आहेत. सध्या गल्लोगल्ली अनेक मुलांच्या हातात नायलॉन मांजा आणि गुंता झालेल्या नायलॉन मांजा रस्त्यावर पडलेला आढळून येत आहे. अनेकांचा जीव गेल्याच्या घटना घडत असतानाही, नायलॉन मांजा राज्यभरात अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात विक्री होत आहे. आता या प्रकरणी पोलीस प्रशासन गंभीर दखल घेणार आहे की नाही? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जगाला हेवा वाटणारा प्रयागराजमधील महाकुंभ



प्रयागराज, भारतातील एक महत्त्वाचे तीर्थक्षेत्र. हिंदू धर्मात विशेष महत्त्व असलेल्या दुर्मीळ अशा महाकुंभ मेळ्याची सुरुवात यंदा प्रयागराजमध्ये झाली आहे. गंगा, यमुना आणि सरस्वती या नद्यांच्या संगमावर १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी या ४५ दिवसांच्या कालावधीत महाकुंभ मेळा हा हिंदूंचा धार्मिक उत्सव साजरा होत आहे; परंतु या वर्षीचा कुंभमेळा हा निव्वळ कुंभमेळा नसून तो महाकुंभमेळा आहे. १४४ वर्षांतून एकदा येणारा हा एक दुर्मीळ क्षण मानला जातो. दुर्मीळ ग्रहस्थितीमुळे यंदाच्या महाकुंभ मेळ्याला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. जगातील सर्वात मोठा धार्मिक मेळा असे या कुंभमेळ्याचे वर्णन सध्या केले जाते आहे. दर बारा वर्षांनी हरिद्वार, नाशिक, उज्जैन आणि प्रयागराज या चार ठिकाणी कुंभमेळा भरतो. यंदाच्या प्रयागराज कुंभमेळ्यात ४५ कोटींहून अधिक भाविक सहभागी होणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत असल्याने, त्याची दखल जगभरातील प्रमुख्य देशातील माध्यमांनी घेतली आहे.

महाकुंभ मेळ्यात गेल्या दोन दिवसांत लाखोंच्या संख्येने भाविक याठिकाणी दाखल झाले आहेत. विदेशी भाविकांनाही याची भुरळ पडली असून हा आध्यात्मिक मेळावा ते अनुभवत आहेत. पवित्र स्नान आणि आध्यात्मिक अनुभूतीमुळे विदेशी नागरिक महाकुंभ मेळ्यासह भारताचे कौतुक करताना दिसत आहेत. विशेष म्हणजे या महाकुंभ मेळ्यात सहभागी होण्यासाठी जगभरातून अनेक महिला यात्रेकरू आल्या आहेत. या महाकुंभ मेळ्यात सहभागी होण्याची संधी मिळाल्याने स्वतःला मी खूप भाग्यवान समजते. भक्ती योग आणि सनातन धर्माविषयीचे ज्ञान घेऊन आम्ही येथे आलो आहोत. आता गंगेत स्नान करण्यासाठी, सर्वांसोबत आध्यात्मिक साधना करण्यासाठी उत्सुक आहे, अशी प्रतिक्रिया पेरू देशातील एका यात्रेकरूने वृत्तसंस्थेला दिली आहे. भारताचा आत्मा या क्षणी खूप शक्तिशाली आहे. गुरू आणि शनी एका रेषेत आहेत. महाकुंभ हा केवळ भारतासाठी नाही, तर महाकुंभ सर्व जगासाठी आहे, अशी प्रतिक्रिया अमेरिकेतून आलेल्या एका भाविकांने व्यक्त केली. अमेरिकेतील प्रमुख माध्यम समूहांपैकी सीएनएन वृत्तसंस्थेने 'प्रयागराजमधील महाकुंभमेळा हा जगातील सर्वात मोठ्या धार्मिक कार्यक्रमांपैकी एक आहे. महाकुंभमेळास येणाऱ्या भाविकांची संख्या अचंबित करणारी आहे. महाकुंभमेळ्यात सेलिब्रिटी आणि परदेशी पर्यटक एकत्र येतात', असे वर्णन केले आहे, तर ब्रिटिश माध्यम समूहाचा भाग असलेल्या बीबीसीने या महाकुंभमेळ्याबाबत मानवतेचा सर्वात मोठा मेळावा असल्याचे वृत्तांकन करताना वर्णन केले आहे. वृत्तवाहिनीने प्रयागराजमध्ये विविध देशांतील भाविकांशीही संवाद साधला. अर्जेंटिनातून आलेल्या व्यक्तीने बीबीसीशी बोलताना सांगितले की, प्रत्यक्ष भक्ती काय असते, हे अनुभवण्यासाठी महाकुंभमेळात सहभागी झालो आहे. गंगा नदीने मला बोलावले, म्हणून मी इथे आलो आहे.

अमेरिकेची लोकसंख्या सुमारे ३४ कोटी आहे. त्यापेक्षा जास्त लोक म्हणजे अंदाजे ४५ कोटी उत्तर प्रदेश राज्यात पुढील ४५ दिवसांमध्ये या महाकुंभात स्नान करण्यासाठी पोहोचणार आहेत. सौदी अरेबियातील मुस्लिमांसाठी पवित्र स्थळे असलेल्या मक्का आणि मदीना येथे दरवर्षी हजसाठी जाणाऱ्या २० लाख लोकांपेक्षा कुंभमेळ्यातील संख्या जास्त आहे. त्यामुळे ही संख्या २०० पट अधिक मानायला हरकत नाही. त्यामुळेच हा कार्यक्रम उत्तर प्रदेश सरकारची एक मोठी परीक्षा असणार आहे. केंद्रातील मोदी सरकार आणि उत्तर प्रदेशमधील मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही सरकारकडून या कुंभमेळ्याची चोख व्यवस्था व्हावी याची दक्षता घेतली गेली आहे. उत्तर प्रदेश सरकारकडून महाकुंभासाठी पायाभूत सुविधांपासून स्वच्छतेपर्यंतचे ६ हजार ९०० कोटी रुपयांचे ५४९ प्रकल्प सुरू केले आहेत. त्याचप्रमाणे भाविकांना योग्य माहिती मिळावी यासाठी महाकुंभ-२०२५ च्या लोगोचे अनावरण करून वेबसाइट आणि ॲपदेखील लॉन्च केले. तसेच हे संकेतस्थळ भाविक आणि पर्यटकांसाठी हवाई, रेल्वे आणि रस्त्याने महाकुंभला पोहोचण्यासाठी मार्गदर्शक म्हणून ठरत आहेत. याद्वारे प्रयागराजमधील राहण्याची व्यवस्था, स्थानिक वाहतूक, पार्किंग, घाटांवर जाण्याचे दिशानिर्देश इत्यादींची माहिती उपलब्ध आहे. तसेच स्थानिक आणि जवळपासची आकर्षणे आणि पर्यटन स्थळांचे मार्गदर्शनही यात आहे. तसेच या महाकुंभमुळे उत्तर प्रदेश सरकारच्या महसुलात २५ हजार कोटी रुपयांची भर पडण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. या कार्यक्रमामुळे स्थानिक स्व-मदत गट, कारागीर, हॉटेलवाले, होमस्टे मालक, रेस्टॉरंट ऑपरेटर आणि खाद्यपदार्थ विक्रेत्यांना फायदा होणार आहे. पहिल्यांदाच कोणत्याही घटनेत इतक्या मोठ्या प्रमाणात चेहरा ओळखण्याचे तंत्रज्ञान आणि बायोमेट्रिक ओळख याठिकाणी वापरण्यात येत आहे, ज्यामुळे लोकांची सुरक्षितता सुनिश्चित होण्यास मदत होणार आहे आणि एखादी व्यक्ती हरवल्यास त्यांना शोधणे सोपे होणार आहे. कार्यक्रमादरम्यान लोक स्वच्छ आणि शुद्ध पाण्यात स्नान करतील याची खात्री करण्यासाठी गंगा नदीजवळ पाण्याची गुणवत्ता मोजण्यासाठी यंत्रणा बसवण्यात आली आहे. याशिवाय, १०० खाटांचे एक प्राथमिक रुग्णालय आणि २० खाटांचे दोन रुग्णालये या परिसरात उभारण्यात आली आहेत. श्रद्धेचा भाग म्हणून लाखो हिंदू धर्मिय मोक्ष प्राप्तीची कामना करण्यासाठी आणि पापाचा नाश करण्यासाठी कुंभमेळ्यात डुबकी मारून स्नान करत असले तरी, जगभरातील माध्यमे आता महाकुंभ मेळ्याकडे मोठा इव्हेंट म्हणून पाहत आहेत. गेल्या अनेक वर्षांच्या परंपरेनुसार दर बारा वर्षांनी होत असलेल्या कुंभमेळ्याची चर्चा पूर्वी भारतीयांपुरती असायची. आता विदेशातील अनेक देशांना महाकुंभ मेळ्यातील परंपरा, कथा जाणून घेण्याची जिज्ञासा निर्माण झाली आहे.

## रेल्वे स्थानकांच्या परिसरात पावसाचे पाणी साचणार नाही

# यासाठी महानगरपालिका व रेल्वे प्रशासनाने समन्वयाने उपाययोजना आखाव्यासत

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

मुंबईत जोरदार पावसाप्रसंगी उपनगरीय रेल्वे सेवा बाधित झाल्यास जनजीवन विस्कळीत होते. गतवर्षी चुनाभट्टी, भांडुप रेल्वेस्थानकात पाणी साचल्याने रेल्वे सेवा बाधित झाली. या वर्षी त्याची पुनरावृत्ती होता कामा नये. यासाठी रेल्वे स्थानकांच्या ठिकाणी पावसाळ्यात संभाव्य आव्हानांवर महानगरपालिका आणि रेल्वे प्रशासन यांच्या समन्वयाने उपाययोजना आखाव्यात. बृहन्मुंबई महानगरपालिका आणि रेल्वे अधिका-यांनी संयुक्त स्थळ पाहणी करावी. दीर्घकालीन कायमस्वरूपी तोडगा काढण्याबरोबरच विविध पर्यायांची चाचपणी करावी. रेल्वे परिसरातून वाहणा-या नाल्यांची, कलव्हर्टची स्वच्छता करावी. ही कामे विहित वेळेत पूर्ण करून पाणी साचण्याच्या संभाव्य ठिकाणी नागरिकांना दिलासा मिळेल, अशा त-हेने उपाययोजना कराव्यात, असे निर्देश अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) श्री. अभिजीत बांगर यांनी दिले. बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक श्री. भूषण गगराणी यांनी अलीकडे म्हणजे दिनांक १८ फेब्रुवारी २०२५ रोजी पावसाळा पूर्वतयारी आढावा बैठक घेतली होती. या बैठकीत रेल्वे प्रशासनातर्फे मध्य रेल्वे मार्गावरील चुनाभट्टी, भांडुप रेल्वे स्थानकांबाबत काही मुद्दे उपस्थित करण्यात आले



होते. या मुद्यांचा निपटारा करण्याच्या अनुषंगाने अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) श्री. अभिजीत बांगर यांनी आज (दिनांक २५ फेब्रुवारी २०२५) महानगरपालिका पर्जन्य जलवाहिन्या खाते, पूल खाते आणि रेल्वे विभागाच्या अधिका-यांची बैठक घेतली. त्यावेळी श्री. बांगर यांनी निर्देश दिले. महाराष्ट्र नगर सब वे येथील लघु उदंचन केंद्रात ५ द ५ मीटर क्षमतेची साठवण टाकी (संप) आहे. या साठवण टाकीची क्षमता १५ द ६ मीटर करणे आवश्यक आहे. त्यासाठी रेल्वेच्या जमिनीवर बांधकाम करावे लागणार आहे. रेल्वे विभागाशी समन्वय ठेवून निविदा प्रक्रिया वेळेत पूर्ण केली तर दिनांक ३१ मे २०२५ पर्यंत जलद गतीने काम होईल, हे सुनिश्चित करावे, अशा सूचना विभागास देण्यात आल्या. चुनाभट्टी रेल्वे स्थानकाबाबत पर्जन्य जलवाहिन्या विभागाने असे प्रस्तावित केले की, हायवे सोसायटीकडून येणारे पावसाळी पाणी २ उच्च क्षमतेचे पंप लावून नाल्यामध्ये सोडण्यात यावे. जेणेकरून हे पाणी चुनाभट्टी रेल्वे स्थानक दिशेला जाणार नाही. मात्र, या उपाययोजनेमुळे पाणी वहनाची परिणामकारकता १०० टक्के राहील, याबाबत साशंकता असल्याने चुनाभट्टीकडे जाणारी पावसाळी जलवाहिनी ही महामार्ग ओलांडून झोपडपट्टी क्षेत्राबाहेर रेल्वे हद्दीतून बाहेर काढणे आणि पुढे ही जलवाहिनी पश्चिमेकडील अस्तित्वातील नाल्यास जोडावी, जेणेकरून अतिरिक्त पावसाळी पाणी मिठी नदीकडे वळविणे असा पर्याय सुचविण्यात आला. हा प्रस्ताव व्यवहार्य वाटल्यास त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, असे निर्देश श्री. बांगर यांनी दिले. उषा नगर (भांडूप) येथे पूल विभागामार्फत पूल / कल्वर्टचे काम सुरू आहे. त्या ठिकाणची समांतर जलवाहिनी स्थलांतरीत करून छोटा पूल पाडणे आत्यंतिक आवश्यक आहे, अन्यथा मागील वर्षाच्या पावसाप्रमाणे यंदादेखील पाणी साचण्याची दाट शक्यता आहे. दिनांक १५ मे २०२५ पर्यंत जलवाहिनी स्थलांतर केली जाईल तसेच जीर्ण पूल निष्कासन करण्याबाबत दक्षता घेतली जाईल, असे पूल विभागाच्या अधिका-यांनी नमूद केले. माटुंगा येथे रेल्वे विभागाकडून रूळाखालून पावसाळी जलवाहिनी विस्तारीकरणाचे काम सुरू आहे. मात्र, त्याची लांबी ८०० मीटरपर्यंत वाढवावी जेणेकरून त्याची उपयुक्तता वाढेल, असा निर्णय बैठकीत घेण्यात आला. अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) श्री. बांगर म्हणाले की, पावसाळ्यास ३ महिन्यांची अवधी आहे. तत्पूर्वी, या कालावधीत रेल्वे विभाग आणि महानगरपालिका यांच्यात उच्च प्रतीचा समन्वय ठेऊन कमीतकमी कालावधीत कामे पूर्ण करावीत. जेणेकरून रेल्वे रूळांवर पाणी साचण्याच्या घटना टाळता येतील. उपनगरीय रेल्वेसेवा पावसाळ्यात बाधित होणार नाही, अशारितीने सर्व कामे चोखपणे पूर्ण करावीत. जोरदार पावसामुळे रेल्वे मार्गांवर पाणी तुंबणार नाही, यासाठी पाणी साचणा-या ठिकाणी उपसा पंप बसवावेत. जेणेकरून पाऊस जास्त झाल्यास पाण्याचा तत्काळ निचरा करता येईल. रेल्वे अंतर्गत असलेल्या ठिकाणी गाळ, कचरा, राडारोडा उचलण्यात यावा; नियमितपणे नाले स्वच्छता करावी, असे निर्देश श्री. बांगर यांनी दिले. एम पूर्व विभागाच्या सहायक आयुक्त श्रीमती अलका ससाणे, प्रमुख अभियंता (पर्जन्य जलवाहिन्या) श्री. श्रीधर चौधरी, प्रमुख अभियंता (पूल) श्री. उत्तम श्रोते यांच्यासह संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते

# स्कूल बसेससाठी नियमावली लागू करणार:मंत्री सरनाईक यांची माहिती

## अभ्यासासाठी एक सदस्यीय समितीची नियुक्ती

**मुंबई (वृत्तसंस्था)**

शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या खासगी स्कूल बसेस साठी येत्या नवीन शैक्षणिक वर्षापासून नियमावली निश्चित करण्यात येणार आहे . त्यासाठी निवृत्त परिवहन अधिकारी जितेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य समिती नेमण्यात आली असून त्यांना पुढील एक महिन्यांमध्ये या संदर्भातला अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.संपूर्ण राज्यांमध्ये शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या हजारो स्कूल बस खासगी संस्थांच्या मार्फत चालवण्यात येतात. या स्कूल बसच्या माध्यमातून अनेक संस्थाचालक पालकांची आर्थिक लुबाडणूक करत असल्याच्या तक्रारी परिवहन विभागाला प्राप्त झाल्या आहेत. त्या अनुषंगाने आज परिवहन विभागामध्ये राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. त्यामध्ये येत्या शैक्षणिक वर्षापासून या स्कूल बसेस साठी नवी नियमावली निश्चित करण्यासाठी निवृत्त परिवहन अधिकारी जितेंद्र पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्य समिती नेमण्यात आली असून या समितीने आपला अहवाल पुढील एक महिन्यांमध्ये सादर करावयाचा आहे. तसेच या संदर्भात सन २०११ मध्ये विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या रिक्षाचालकांची मनमानी रोखण्यासाठी मदान समितीने ज्या उपाययोजना सुचवल्या होत्या त्या देखील विचारात घेतल्या जाणार आहेत. या सर्वंकश अहवालाच्या अनुषंगाने नवीन शैक्षणिक वर्षापासून स्कूल बसेस साठी नियमावली निश्चित केली जाणार आहे.



राज्य भरात स्कूल बसेस ज्या संस्थाचालकांच्या माध्यमातून चालवल्या जातात, त्यासंदर्भात अनेक तक्रारी पालकांच्या कडून परिवहन विभागाला प्राप्त झाल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने शैक्षणिक वर्षाच्या एकूण कालावधी पैकी १० महिने या स्कूल बसेस विद्यार्थी वाहतूक करतात. परंतु प्रत्यक्षामध्ये पूर्ण वर्षाचे शुल्क एकाच वेळी संबंधितांकडून आकारले जाते. ते अवाजवी आहे. तसेच शालेय शुल्क व स्कूल बस शुल्क एकाच वेळी पालकांकडून आकारले जात असल्यामुळे त्याचा प्रचंड मोठा आर्थिक बोजा पालकांच्या वर पडतो. जे अत्यंत अन्यायकारक आहे असे अनेक पालकांचे म्हणणे होते. त्याऐवजी संबंधित स्कूल बस चालकांनी केवळ दहा महिन्यासाठीचा विद्यार्थी वाहतुकीचे शुल्क एकाच वेळी न घेता दर महिन्याला स्वीकारावे असे मत पालकांनी व्यक्त केले आहे.मध्यंतरी पनवेल आणि बदलापूर सारख्या ठिकाणी घडलेल्या घटना या अत्यंत अप्रिय आणि धोकादायक असून विद्यार्थ्यांची सुरक्षितता लक्षात घेता प्रत्येक बस मध्ये पॅनिक बटन ,आग प्रतिबंधक स्पिंकलर, ऋझड यंत्रणा, उउढत कॅमेरा आदी उपकरणे असणे आवश्यक आहे. तसेच ज्या संस्था अथवा स्कूल बस चालवणारे चालक पालकांच्या कडून विद्यार्थी वाहतुकीची शुल्क आकारतात, त्यांच्याकडे बसेस मधील सीसीटीव्ही कॅमेऱ्याचे एकात्मिक नियंत्रण असणे आवश्यक आहे. जेणेकरून बसमध्ये भविष्यात विद्यार्थ्यांच्या बाबतीत कोणतीही अप्रिय दुर्घटना घडणार नाही. या सर्व सूचनांचा विचार करून पाटील समितीने आपला अहवाल सादर करावा अशा सूचना मंत्री सरनाईक यांनी दिल्या आहेत.

## महिलांना अश्लील शिव्या देणे हा त्यांचा इतिहास: संजय राऊत ही महाराष्ट्राच्या वैचारिकतेला लागलेली कीड–चित्रा वाघ

**मुंबई (वृत्तसंस्था)**

शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात बोलताना उद्धव ठाकरे यांच्याविषयी वादग्रस्त विधान केले होते. दोन मर्सडिज दिल्या की एक पद मिळते, असे त्यांनी विधान केले होते. यावर खासदार संजय राऊत यांनी टीका केली होती. संजय राऊत यांनी केलेल्या टीकेवर भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी प्रत्युत्तर दिले आहे. संजय राऊत ही महाराष्ट्राच्या वैचारिकतेला लागलेली कीड आहे, अशी टीका चित्रा वाघ यांनी केली आहे.

चित्रा वाघ म्हणाल्या, संवैधानिक पदावर असणाऱ्या नीलम ताई गोऱ्हे यांच्याबद्दल इतक्या घाणेरड्या भाषेत हे संजय राऊत बोलतात. ही महाराष्ट्राच्या वैचारिकतेला लागलेली कीड असल्याचे चित्रा वाघ म्हणाल्या. महिलांबद्दल अतिशय वाईट बोलणे त्यांना अश्लील शिव्या देणे हा संजय राऊतांचा इतिहास आहे. त्यांनी स्वप्ना पाटकर यांना दिलेल्या अश्लील शिवीगाळची क्लीप आज ही समाजमाध्यमांवर उपलब्ध आहे. अशा नाठाळ संजय राऊतांना आता महाराष्ट्रातील महिलांनीच वठणीवर आणले पाहिजे, असे चित्रा वाघ म्हणाल्या.

शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे यांनी केलेल्या वादग्रस्त विधानावर संजय राऊत यांनी टीका केली होती. संजय राऊत यांनी नीलम गोऱ्हे यांच्यावर 'निर्लज्ज, नमकहराम' असे शब्द



वापरत टीका केली होती. ज्या घरात तुम्ही खाल्ले, आमदार झालात त्या विरोधात आज बोलतात, असेही संजय राऊत म्हणाले.पुढे बोलताना संजय राऊत म्हणाले, मला आठवत आहे बाळासाहेब ठाकरे बोलले होते ही बाई कोण आणली. काही लोकांच्या मर्जी खातीर त्या आल्या, गेल्या चार वेळा आमदार झाल्या आणि जाताना ताटामध्ये घाण करून गेल्या. त्या बाईंचे कर्तृत्व काय? विधान परिषदेत हे जर समजून घ्यायचे असेल तर पुण्यात महानगरपालिकेत आमचे गटनेते होते अशोक हरनाळ त्यांची मुलाखत घ्या. त्यांच्याकडून धमक्या देऊन हे जेव्हा पुण्याचा प्लानिंग डीपी सुरू होते तेव्हा कोणा कोणाच्या नावावर या बाईने कोट्यावधी रुपये गोळा केले? हे गटनेते अशोक हरनाळ यांची मुलाखत घ्या, मग हे मर्सडीज प्रकरण काय आहे ते त्यांना कळेल.

### संजय राऊत जे बोलले ते शंभर टक्के बरोबर

## नीलम गोऱ्हे यांचे वक्तव्य मूर्खपणाचे;असे भाष्य करायला नको होते–शरद पवारांची टीका



**मुंबई (वृत्तसंस्था)**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा कार्यक्रम वेगळ्या ठिकाणी होता. तर संमेलनातील इतर कार्यक्रम हे तालकोट मैदानावर झाले. साहित्य संमेलन यशस्वी झाले असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही, असे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी म्हटले आहे. तसेच संजय राऊत यांनी केलेल्या विधानाचे शरद पवार यांनी समर्थन केले आहे. संजय राऊत जे बोलले ते शंभर टक्के बरोबर, असे शरद पवार म्हणाले आहेत.

नीलम गोऱ्हे यांच्यावर बोलताना शरद पवार म्हणाले, नीलम गोऱ्हे यांना चार टर्म कशी मिळाली हे सर्वांना माहीत आहे. तसेच नीलम गोऱ्हे यांना असे भाष्य करण्याची गरज नव्हती. नीलम गोऱ्हे यांचे वक्तव्य मूर्खपणाचे होते. तसेच त्यांनी ते भाष्य केले नसते तर बरे झाले असते. संजय राऊत जे म्हणतात ते योग्य आहे.संजय राऊत यांनी नीलम गोऱ्हे यांच्या वादग्रस्त विधानानंतर नाराजी व्यक्त करत अखिल भारतीय मराठी साहित्य मंडळाला पत्र पाठवले होते. संजय राऊत यांनी आयोजकांवर जाहीर नापसंती व्यक्त केली होती. त्यानंतर साहित्य परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी माफी मागितली असल्याची माहिती शरद पवार यांनी दिली आहे.पुढे बोलताना शरद पवार यांनी धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावर भाष्य केले आहे. पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलताना शरद पवार म्हणाले, नैतिकता आणि या लोकांचा काही संबंध असेल असे मला वाटत नाही. पुढे बोलताना शरद पवार म्हणाले मी त्या गावात जाऊन आलो आहे. त्या गावातील लोकांच्या भावना मी समजू शकतो. कोणालाही स्वाभिमान असेल अशी व्यक्ती त्या पदावर अजिबात राहणार नाही. पण संबंध राज्यातून लोकांचा हल्ला होत आहे तरी सुद्धा सत्तेवर आपण बसून राहायचे ही जी भूमिका घेऊन हे लोक वागत आहेत.

## संजय शिरसाट हे स्वत: गुत्तेदारी करतात:माझ्या नादाला लागू नका नाहीतर सगळेच बाहेर काढेन, अंबादास दानवेंचा इशारे

**छत्रपती संभाजीनगर (वृत्तसंस्था)**

शिवसेना शिंदे गटाच्या नेत्या नीलम गोऱ्हे यांनी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात उद्धव ठाकरे यांच्याविषयी वादग्रस्त विधान केले होते. दोन मर्सडिज दिल्या की एक पद मिळते, असे विधान नीलम गोऱ्हे यांनी केले होते. यावरून ठाकरे गट आक्रमक झाल्याचे पाहायला मिळत आहे. तसेच यावर आता शिंदे गटाच्या नेत्यांनी देखील प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली आहे.



शिवसेना ठाकरे गट व शिवसेना शिंदे गटात आरोप-प्रत्यारोप सुरू झाले असून संजय शिरसाट यांनी संजय राऊत यांच्यावर टीका केली आहे. संजय शिरसाट म्हणाले, संजय राऊत यांच्याकडील गाड्या कोणाच्या नावावर आहेत, ते त्यांनी सांगावे. जास्त बोलायला लाऊ नका, झाकली मूठ सव्वालाखाची ठेवा. कोणी कोणी गाड्या दिल्या, कोणी काय काय दिले हे जर एक एक जण बोलायला लागले तर दिवस पुरणार नाही, अशी टीका संजय शिरसाट यांनी केली आहे. याला ठाकरे गटाचे नेते अंबादास दानवे यांनी प्रत्युत्तर दिले आहे.अंबादास दानवे संजय शिरसाट यांना प्रत्युत्तर देताना म्हणाले, संजय शिरसाट हे स्वतः गुत्तेदारी करतात, ते मुंबईतील ७२ व्या मजल्यावर राहतात. छत्रपती संभाजीनगरमध्ये २२ हजार स्क्वेअर फुटाचा बंगला त्यांनी कसा मिळवला याचं उत्तर द्यावे. माझ्या घरासमोर असलेल्या गाड्या या माझ्याच नावावर आहेत, तुमच्या घराच्या मागे असलेले जेसीबी, कोट्यवधी किमतीच्या गाड्या या कशा कमावल्या याचे उत्तर त्यांनी द्यावे. माझ्या नादाला लागू नका नाहीतर सगळेच बाहेर काढेन, असा इशारा अंबादास दानवे यांनी दिला.पुढे बोलताना अंबादास दानवे म्हणाले, निलमताईंना चार वेळा आमदार केले. दोन वेळा त्यांना उपसभापती केले आणि इतर दोन पदेही दिली. त्यामुळे त्यांनी १२ मर्सिडिज दिल्या का? त्या महिला आहेत म्हणून शब्द वापरता येत नाहीत पण नमक हरामीपणा केला जातोय. इतर महिलांना संधी न देता निलम ताईंना संधी दिल्या. तुम्ही गद्दारी केली तर केली. आता आहे तिथे नीट राहा ना. औकात नसणाऱ्यांना संघटनेच्या ताकदीवर पदे मिळाली. मी सुद्धा सर्वसामान्य कार्यकर्ता आहे. मी कुठून मर्सिडिज देणार होतो. किमान बाळासाहेब ठाकरे यांच्याशी तरी इमान राखायला हवे होते. हे पाप तुम्हाला इथेच फेडायला लागणार आहे.

## नमो किसान निधीत ३ हजार रुपये वाढवणार

**नागपूर (वृत्तसंस्था)**

केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या विकासासाठी समर्पित असून या दिशेने जोरकस प्रयत्न सुरू आहेत. शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा फायदा होत आहे. राज्य शासनही केंद्राप्रमाणे राज्यातील शेतकऱ्यांना ‘नमो किसान सन्मान निधी योजनेंतर्गत’ ६ हजार रुपये देत असून लवकरच हे अर्थसाहाय्य ३ हजार रुपयांनी वाढवण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बिहारमधील भागलपूर येथे प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या १९ व्या हप्त्याचे वितरण झाले. या वितरणाचा राज्यस्तरीय कार्यक्रम मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वनामती येथील वसंतराव नाईक स्मृती सभागृहात आयोजित करण्यात आला. या वेळी ते बोलत होते. पीएम किसान सन्मान निधी योजनेंतर्गत केंद्र शासन वर्षाला शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट ६ हजार रुपये वितरित करते. तर राज्य शासनाच्या वतीने ‘नमो किसानसन्मान निधी योजनेद्वारे’ शेतकऱ्यांना वर्षाकाठी ६ हजार रुपयांची आर्थिक मदत देण्यात येते.

# परळीत पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी; देवेंद्र फडणवीस सरकारचे सात मोठे निर्णय

## आधारसामग्री डाटा धोरणास राज्य सरकारची मान्यता

**मुंबई (वृत्तसंस्था)**
महाराष्ट्र राज्य आधारसामग्री डाटा धोरणास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. त्यासाठी राज्य डाटा प्राधिकरणाची स्थापना करण्यात येणार असून मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नियामक समिती स्थापन करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या निर्णयाला मान्यता देण्यात आली. याबरोबरच बीड जिल्ह्यातील परळी येथे नवीन पशुवैद्यकीय पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास देखील मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे.याच बरोबर १९७६ पूर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पाने बाधित पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरवण्यासाठी प्रलंबित कामांचा कृती कार्यक्रम राबवण्याचा निर्णय; अशा ३३२ गावठाण साठी ५९९.७५ कोटी रुपयांच्या तरतुदीस राज्य सरकारच्या वतीने मंत्रिमंडळाच्या वतीने मंजूरी देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत विविध महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. मंत्रालयातील मंत्रिमंडळ सभागृहात झालेल्या या मंत्रिमंडळ बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते.

मंत्रिमंडळ निर्णय असे-पौड, ता. मुळशी, जिल्हा पुणे येथे लिंक कोर्टऐवजी दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या न्यायालयाची स्थापना करण्यास मान्यता. (विधी व न्याय विभाग),ठाणे जनता सहकारी बँकेत सार्वजनिक उपक्रम, महामंडळे यांना खाते उघडण्यासाठी परवानगी (वित्त विभाग),१९७६ पूर्वीच्या पाटबंधारे प्रकल्पाने बाधित पुनर्वसित गावठाणांमध्ये नागरी सुविधा पुरवण्यासाठी प्रलंबित कामांचा कृती कार्यक्रम राबविण्याचा निर्णय; अशा ३३२ गावठाणासाठी ५९९.७५ कोटी रुपयांच्या तरतुदीस मंजूरी (मदत व पुनर्वसन विभाग),महाराष्ट्र राज्य आधारसामग्री (डेटा) धोरणास मान्यता; राज्य डेटा प्राधिकरण स्थापन करणार. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली नियामक समिती. (नियोजन विभाग),बारामती जिल्हा पुणे येथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी. यासाठी ५६४.५८ कोटी रुपयांच्या तरतूदीस मंजूरी (कृषि व पदुम विभाग),परळी, जिल्हा बीड येथे नवीन पशुवैद्यक पदवी महाविद्यालय स्थापन करण्यास मंजुरी. यासाठी ५६४.५८ कोटी रुपयांच्या तरतूदीस मंजूरी (कृषि व पदुम विभाग),महाराष्ट्र महामार्ग अधिनियम कलम १८(३) १९५५ मध्ये सुधारणा, तसेच महाराष्ट्र महामार्ग अध्यादेश २०२५ ला मान्यता (सार्वजनिक बांधकाम विभाग)



### नाशिक कुंभमेळ्याबाबत उद्या मुंबईत बैठक

## भाविकांची गर्दी वाढणार, अनुचित प्रकार घडू नये म्हणून खबरदारी घ्यावी लागणार-गिरीश महाजन

**नाशिक (वृत्तसंस्था)**–नाशिकमध्ये २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन होणार आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याची सरकारकडून तयारी सुरू झाली आहे. कुंभमेळ्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने ३ हजार ३४५ कोटींचा आराखडा सादर केला आहे. कुंभमेळयाच्या पार्श्वभूमीवर नाशिकच्या महंतांनी अजित पवार यांचीही भेट घेतली आहे. नाशिकच्या कुंभमेळ्याबाबत उद्या मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या अध्यक्षतेखाली बैठक होणार असल्याची माहिती मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. अनुचित प्रकार घडू नये म्हणून खबरदारी घ्यावी लागणार असल्याचेही गिरीश महाजन म्हणाले.



प्रयागराजमध्ये गर्दीचे अंदाज तुटलेले आहेत. अपेक्षेपेक्षा जास्त भाविक प्रयागराज येथील कुंभमेळ्यात येत आहेत. त्यामुळे नाशिकच्या कुंभमेळ्यातही मागील वेळेपेक्षा दुप्पट, तिप्पट किंवा त्यापेक्षा जास्त गर्दी वाढणार आहे. नाशिक येथील गोदावरी नदीचे पात्र छोटे आहे. आमच्याकडे जागा देखील छोटी आहे. त्यामुळे आम्हाला त्याठिकाणी अधिक मेहनत घ्यावी लागणार आहे. याठिकाणी चेंगराचेंगरी होऊ नये किंवा इतर कोणता अनुचित प्रकार घडू नये, यासाठी आम्हाला विशेष खबरदारी घ्यावी लागणार आहे, असे गिरीश महाजन म्हणाले.नाशिक येथील कुंभमेळ्याच्या तयारीच्या चर्चेसाठी बुधवारी दुपारी १२ वाजता सह्याद्री अतिथीगृहावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह दोन्ही उपमुख्यमंत्री, मी आणि सर्व विभागांचे प्रधान सचिव यांसह रेल्वे, विमान सेवेशी संबंधित अधिकाऱ्यांची बैठक होणार आहे. कुंभमेळ्याची खूप तयारी करायची आहे. नाशिकच्या रेल्वे स्टेशनवर दोनच प्लॅटफॉर्म आहेत, त्यासाठी आणखी चार प्लॅटफॉर्म तयार करावे लागतील. दिल्लीत कशाप्रकारे गर्दी वाढली, हे आपण सगळ्यांनीच पाहिले. त्यामुळे नाशिकच्या कुंभमेळ्याची खूप तयारी करावी लागणार आहे. कुंभमेळासाठी लागणाऱ्या निधीबाबतही सर्व प्लॅनिंग उद्याच्या बैठकीत होईल, असे कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले. नाशिकमध्ये २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन होणार आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याची सरकारकडून तयारी सुरू झाली आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाने आराखडा देखील सादर केला आहे. ३ हजार ३४५ कोटींचा हा आरखडा आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी नाशिकचे महंत सिद्धेश्वरानंद सरस्वती आणि आमदार हिरामण खोसकर यांनी अर्थमंत्री अजित पवार यांची भेट घेतली. रस्ता रुंदीकरण आणि साधूसंतांच्या व्यवस्थेसाठीच्या तयारीबाबत यावेळी महंतांकडून अजित पवारांना सूचना करण्यात आल्या. महंतांच्या या सूचनांवर अजित पवार यांनीही सकारात्मकता दर्शवल्याची माहिती आहे.

## जयंत पाटील-बावनकुळेंची मध्यरात्री भेट:भाजपच्या बड्या नेत्याचा पुढाकार

### दोन्ही नेत्यांत तासभर चर्चा, पवारांना सोडणार का?

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सोमवारी मध्यरात्री भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतल्याची मोठी बातमी समोर आली आहे. या भेटीमुळे जयंत पाटील हे भाजपच्या वाटेवर असल्याची चर्चा पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

'टीव्ही ९ मराठी'च्या वृत्तानुसार, जयंत पाटील यांनी सोमवारी मध्यरात्री चंद्रशेखर बावनकुळे यांची त्यांच्या मुंबई स्थित बंगल्यावर भेट घेतली. भाजपच्या एका ज्येष्ठ नेत्याने या दोघांची भेट घडवून आणली. या तिन्ही नेत्यांमध्ये जवळपास तासभर चर्चा झाली. या चर्चेचा तपशील पुढे आला नाही, पण ही भेट जयंत पाटील यांच्या संभाव्य भाजप प्रवेशाभोवती फिरती असल्याचा दावा केला जात आहे.दुसरीकडे, स्वतः जयंत पाटलांनी आपण चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेतल्याचे स्पष्ट केले आहे. पण त्याचवेळी त्यांनी



ही राजकीय भेट नसल्याचेही ठणकावून सांगितले आहे. ते म्हणाले, काल सायंकाळी ७.५० वा. त्यांच्या घरी माझी भेट झाली. सांगली जिल्ह्यातील काही महसुली प्रश्नांवर मी काही १०-१२ निवेदने दिली. ही निवेदने देण्यासाठी मी त्यांची वेळ मागितली होती. महसूल विभागात सात बारा ऑनलाईन केलेत. अनेक शेतकऱ्यांचे सातबारा चुकलेत. पण त्याच्या दुरुस्त्या वेळेवर होत नाहीत. हा सर्व महाराष्ट्राचा प्रश्न होता. त्याकडे त्यांचे लक्ष वेधले. अनेक जमिनींना एक्वायर झालेल्या नोटीसी दिल्यात. त्याच्यावर शिक्के मारलेत. पण या जमिनीचे भूसंपादनही झाले नाही किंवा शेतकऱ्यांना त्याचा मोबदलाही दिला नाही. असे आमच्या जिल्ह्यातले विविध प्रश्न होते. यासाठी मी त्यांना भेटलो.आमची भेट ६ वा. होणार होती. पण त्यांची हिअरिंग बराचवेळी चालली. ६.५० वा. ते त्यांच्या घरी आले. त्यानंतर मी त्यांची भेट घेतली. आम्हा दोघांत २५ मिनिटे चर्चा झाली. त्यात कोणतीही राजकीय झाली नाही. माझ्यासोबत राधाकृष्ण विखे पाटील होते. स्टाफ होता. माझ्यासोबत शिष्टमंडळातील ४-५ जण होते. तुम्हाला मी दिलेल्या निवेदनांचे रेकॉर्डही पाहता येईल, असे जयंत पाटील म्हणाले.

# पुसरा फाटा येथील व्हॉलीबॉल स्पर्धेत कोळगाव संघ विजयी

## स्पर्धेत जिल्ह्यातील ४० संघाने नोंदवला सहभाग

**वडवणी (प्रतिनिधी):** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या निमित्त पुसरा फाटा येथे झालेल्या जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्यातील कोळगाव संघाने माजलगाव संघाविरुद्ध १० गुणांनी बाजी मारत प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळवून चषक पटकावले आहे.

वडवणी तालुक्यातील पुसरा फाटा येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंतीचे औचित्य साधून जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन शिवबा हॉलीबॉल हिवरगव्हाण- पुसरा संघाच्या वतीने केले होते. स्पर्धेचे उद्घाटन नगराध्यक्ष शेषेराव जगताप, संजय आंधळे, जि.प. सदस्य औदुंबर सावंत, रा.काँ. तालुकाध्यक्ष बजरंग साबळे, अमरसिंह मस्के, सचिन लंगडे, संतोष डावकर, नागेश डिगे, महादेव नाईकवाडे, नंदु नाईकवाडे, सरपंच बंडू नाईकवाडे, महादेव सावंत, डॉ. ताकट, अंकुश नाईकवाडे, आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेमध्ये बीड जिल्ह्यातील ४० संघानी सहभाग घेतला होता. अंतिम सामना गेवराई तालुक्यातील कोळगाव संघ व माजलगाव संघ यांच्यामध्ये झाला. चुरशीच्या सामन्यामध्ये कोळगाव संघाने १० गुणांनी विजय मिळवून प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळवून चषक पटकाविल. या संघाला १५ हजार रुपये रोख रक्कम व चषक देवून गौरविण्यात





आले. प्रथम पारितोषिक जिल्हा परिषदेचे माजी सभापती जयसिंग सोळंके यांच्या वतीने देण्यात आले होते. द्वितीय पारितोषिक माजलगाव संघाने पटकावले असून द्वितीय पारितोषिक माजी जिल्हा परिषद सदस्य औदुंबर सावंत व आनंद काळे यांच्या वतीने देण्यात आले होते. तर तृतीय पारितोषिक आष्टी संघाने पटकावले असून हे पारितोषिक भाजपाचे युवा नेते संजय आंधळे यांच्यावतीने देण्यात आले. चतुर्थ क्रमांकाचे पारितोषिक नांदुर संघाने पटकावले हे पारितोषिक मोरवड सरपंच विवेक आंडिल यांच्या वतीने देण्यात आले. पाचवे पारितोषिक माळेगाव संघाने पटकावले हे बक्षीस शिवसेना पक्षप्रमुख उबाठा गटाचे तालुकाप्रमुख विनायक मुळे यांच्या वतीने देण्यात आले. सहावे पारितोषिक चिंचवण संघाने पटकावले असून हे बक्षीस सचिन लंगडे यांच्या वतीने देण्यात आले. सातवे पारितोषिक नित्रुड संघाने पटकावले असून हे पारितोषिक बंटी माळी यांच्या वतीने देण्यात आले. तर आठवे पारितोषिक वडवणी संघाने पटकावले असून हे पारितोषिक राहुल टकले यांच्या वतीने देण्यात आले तर नववे पारितोषिक श्रीमंतयोगी नित्रुड संघाने पटकावले असून हे पारितोषिक प्रदिप बहीरे यांच्यावतीने देण्यात आले. तर दहावे पारितोषिक राजमाता संघाने पटकावले असून हे बक्षीस भाऊसाहेब जाधव यांच्या वतीने देण्यात आले. असे दहा पारितोषिक देऊन व्हॉलीबॉल संघाचा गौरव करण्यात आला आहे. यावेळी हॉलीबॉल संघाला जर्सीची व्यवस्था भाजपा युवा नेते अमरसिंह मस्के यांच्या वतीने करण्यात आली होती. तर बेस्ट शुटर श्रीराम नाईकवाडे, बेस्ट नेटर चेअरमन महादेव नाईकवाडे, शिस्तबद्ध संघ नंदू नाईकवाडे, उत्कृष्ट संघ अंकुश नाईकवाडे, नेट बॉल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुका अध्यक्ष बजरंग साबळे,भोजन व्यवस्था सरपंच बंडू नाईकवाडे, सरपंच रामराव सावंत, मंडप व्यवस्था दत्ता ढवळे, लाईट जनरेटर भास्कर गायकवाड,पाणी व्यवस्था शिवम सावंत, तर या स्पर्धेला विशेष सहकार्य म्हणून भागवत सावंत, बालाजी दराडे, सचिन सानप, हरिभाऊ पवार, शिवाजी तौर, डॉ.विशाल ताकट, कुणाल मुंडे, राहुल चिंचकर, भागवत नाईकवाडे, गोरक्षनाथ नाईकवाडे, दिलीप शेंडगे, महादेव सावंत, भाऊसाहेब जाधव, प्रमेश्वर मस्के, ईश्वर नाईकवाडे, कैलास नाईकवाडे, राहुल बहिरे, मच्छिंद्र सावंत यांनी विशेष सहकार्य केले आहे. या स्पर्धेचे आयोजन पत्रकार अविनाश मुजमुले आणि शिवबा व्हॉलीबॉल संघ हिवरगव्हाण- पुसरा यांच्यावतीने करण्यात आले होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077